महाराष्ट्र पोलीस

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

पोलीस आयुक्त, ठाणे शहर यांचे कार्यालय

खारकर आळी, कळवा ब्रिज जवळ, ठाणे, ४००६०१, दूरध्वनी क्रमांक - ०२२ - २५४४३६३६
Email - cp.thane.confibr@mahapolice.gov.in

जा.क्र.ठाआ/गोशा/विधी अधिकारी नियुक्ती/ 480 /२०२४, दि. 16 /०३/२०२४

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.अेपीआ ३१०६/प्र.क्र./२२७/ पोल ३, दिनांक २१/०८/२००६

२) महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.एसपीपी -२००५/प्र.क्र.२४७/पोल-१०, दिनांक १५/०९/२००६

३) महराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्रमांक एपीओ-२००५/प्र.क्र२४७/पोल-१०, दिनांक २६/०६/२००७

४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडील क्र. पोमसं/२ अ/विधी अधिकारी- निवड मंडळ/२/२०७, दि. १०/११/२०२१

विषय :- विधी अधिकारी गट - अ, विधी अधिकारी गट - ब आणि विधी अधिकारी या पदावर ११ महिन्यासाठी पूर्णतः कंत्राटी पध्दतीने नियुक्तीबाबत.

---०००---

आदेश :-

ठाणे शहर पोलीस आयुक्त यांचे अधिनस्त कार्यालयातील विधी अधिकारी गट - अ, विधी अधिकारी गट - ब आणि विधी अधिकारी या पदाकरीता दिनांक १३/०१/२०२४ रोजी घेण्यात आलेली लेखी परिक्षा तसेच दिनांक २७/०२/२०२४ व दिनांक २८/०२/२०२४ रोजी घेण्यात आलेली मुलाखत चाचणीस अनुसरून गुणवत्तेनुसार निवड केलेल्या खालील नमुद उमेदवारांची ११ महिन्याच्या कालावधीकरीता खालील नमूद अटी व शर्तीच्या अधिन राहून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात पूर्णतः कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात येत आहे.

अ.क्र.	उमेदवाराचे नाव
१	श्री. संजय विलास वैदय
२	श्रीमती संगिता गोविंदराव कारभारी
३	श्री. सुनिल सावळराम अधिकारी
४	श्री. सुनिल नागो वारडे
५	श्री. सतिषकुमार रघुपती चेट्टीयार
६	श्रीमती वहिदा मेहबूब मुल्ला
७	श्रीमती उज्वला सुरज सावंत
८	श्रीमती गीताबाई दत्तात्रय साळुंके
९	श्री. रमण शिवाजी वसावे
१०	श्रीमती सुनंदा तुकाराम चौधरी
११	श्री. मिलींद श्रीधर जाधव
१२	श्री. नितीन केरू सोनवणे
१३	श्री. सुनिल सिताराम घोलप
१४	श्रीमती अंजली नानासाहेब गोरे

अटी व शर्ती :-

१) विधी अधिकारी गट - अ, विधी अधिकारी गट - ब आणि विधी अधिकारी या पदाचे मानधन खालीलप्रमाणे राहील.

अ.क्र.	पदाचे नाव	वेतन
१	विधी अधिकारी गट अ	मासिक वेतन रु. ३०,०००/- + दुरध्वनी व प्रवासखर्चासाठी रु. ५,०००/- **एकुण मासिक देय रक्कम रुपये ३५,०००/-**
२	विधी अधिकारी गट ब	मासिक वेतन रू. २५,०००/- + दुरध्वनी व प्रवासखर्चासाठी रू. ३,०००/- **एकुण मासिक देय रक्कम रूपये २८,०००/-**
३	विधी अधिकारी	मासिक वेतन रू. २०,०००/- + दुरध्वनी व प्रवासखर्चासाठी रू. ३,०००/- **एकुण मासिक देय रक्कम रूपये २३,०००/-**

२) सदरची नियुक्ती ही पूर्णत: कंत्राटी पध्दतीने असून, सदर विधी अधिका-यांना शासकीय अधिकारी/ कर्मचारी म्हणुन गणले जाणार नाही.

३) सदरची नियुक्ती ही ११ महिन्याच्या कालावधीसाठी पूर्णत: कंत्राटी पध्दतीची असल्याने, उमेदवाराने शासन निर्णय क्र. एसपीपी २००५/प्रक्र २४७/पोल १०, दि. १५/०९/२००६ मध्ये दिलेल्या करार पत्रानुसार तसे करार पत्र (Agreement) करुन देणे आणि त्यामध्ये नमूद केलेल्या अटीच्या अधीन राहून सेवा देणे बंधनकारक राहील.

४) निवड झालेल्या उमेदवारांना सक्षम प्राधिका-याच्या पूर्व परवानगीशिवाय खाजगी वकीली व्यवसाय करता येणार नाही.

५) निवड झालेल्या उमेदवारास प्रत्येक आठवडयात नेमलेल्या कामकाजासाठी कायदेविषयक सल्ला देण्यासाठी कमीत कमी ३० तासांचा कालावधी देणे बंधनकारक राहील.

६) निवड झालेल्या उमेदवाराने ११ महिने सेवा केल्यानंतर त्याच्या सेवेची आवश्यकता असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी वाढविता येईल. तथापि अशी मुदत वाढविताना ११ महिन्यापेक्षा अधिक असणार नाही. अशा प्रकारे जास्तीत जास्त तीन वेळा नियुक्ती करता येईल. त्यानंतर अशा उमेदवाराची पुन:श्च नियुक्ती करणे आवश्यक आहे, असे सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास त्या उमेदवारांस पुन:श्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

७) उमेदवाराची निवड ही पूर्णत: तात्पुरती ११ महिन्याच्या कंत्राटी पध्दतीची असल्याने त्यांची सेवा समाधानकारक नसल्यास किवा त्यांचे गैरवर्तन आढळून आल्यास त्यांची सेवा कोणत्याही वेळी कोणतेही कारण नमूद न करता किंवा पुर्वसूचना न देता खंडीत करण्यात येईल.

८) निवड केलेल्या उमेदवारास उपरोक्त नमूद एकत्रीत केलेले वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चा व्यतिरिक्त इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय असणार नाहीत.

९) सदरील विधी अधिकारी यांच्या नेमणूका हया मा. सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असलेल्या विशेष हक्क याचिका क्र. १९००८ - १९००९/२०१२, ३४७८८- ३४७८९/२०१२ मध्ये मा. सर्वोच्च न्यायलयाने दिनांक १२/०७/२०१६ रोजी दिलेल्या अंतिम निर्णयानुसार भरण्यात येत आहेत.

कर्तव्य व जबाबदा-या :-

१) कार्यालयाकडे प्राप्त होणाऱ्या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत / न्यायालयीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हताळणे.

२) सेवाविषयक / प्रशासकीय बाबी / विभागीय चौकशी तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३) प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलांकडे पाठपुरावा करणे जेथे शासन प्रतिवादी आहे अशा प्रकरणी सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिकाऱ्यांच्या मदतीने तयार करणे.

४) शपथपत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता घेवून न्यायालयात विहीत मुदतीत सादर होईल हे पाहणे.

५) जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणांमध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्अनुषंगाने अपील दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६) अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबंधित सरकारी वकिलांकडे पाठविणे व अपीलाचा अंतिम निर्णय लागेपर्यन्त पाठपुरावा करणे.

७) विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमून दिलेले कार्य विहित मुदतीत पार पाडणे.

८) पोलीस स्टेशनमध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

९) कायदा, सेवा व प्रशासकिय इतर अनुषंगीक कामे पाहणे. तसेच वरीष्ठ कार्यालयाकडून जे काम करण्याबाबत आदेश दिले जातील त्या कामाची पूर्तता वेळेत करणे. सदरबाबत वेगळे मानधन दिले जाणार नाही.

संदर्भीय शासन निर्णयास अनुसरुन तसेच उपरोक्त आदेशास अनुसरुन विधी अधिका-यांचे एकत्रीत अनुज्ञेय मासिक वेतन तसेच दुरध्वनी व प्रवास खर्च हा सन २०२३-२०२४ आणि सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरीता संबंधित शिर्षाखाली मंजुर करण्यात आलेल्या तरतुदीनुसार भागविण्यात यावा.

वर नमूद विधी अधिकारी यांनी दिनांक १८/०३/२०२४ रोजी ठाणे शहर पोलीस आयुक्तालयात न चुकता हजर व्हावे. नमूद विधी अधिकारी हजर झाल्यानंतर त्यांचे ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील नेमणूकीबाबतचे स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

16/3

पोलीस आयुक्त, ठाणे शहर
यांचे आदेशान्वये

(रुपाली अंबुरे)
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय १
ठाणे शहर

प्रति,

सर्व संबंधित विधी अधिकारी

प्रत व मार्फत :- सहायक पोलीस आयुक्त, नियंत्रण कक्ष, ठाणे शहर

२/- सदर आदेशाची सर्व सबंधित विधी अधिकारी यांना बजावणी करुन त्याबाबतचा पुर्तता अहवाल या कार्यालयात सादर करावा.

प्रत :- कार्यालय अधीक्षक, लेखा शाखा, ठाणे शहर
प्रभारी अधिकारी, सोशल मिडीया सेल, ठाणे शहर (संकेतस्थळ प्रसिध्दीसाठी)
समन्वय अधिकारी, ९ ए एस कक्ष, ठाणे शहर (पोलीस पत्रकामध्ये प्रसिध्दीसाठी)